**ठळक बातम्या**

- ऑपरेशन सिंदूर ही केवळ एक लष्करी मोहिम नाही, तर निर्धार, धैर्य आणि बदलत्या भारताचं प्रतिबिंब असल्याचं प्रधानमंत्र्यांचं ‘मन की बात’ मधे प्रतिपादन

- नक्षली कारवायांविरोधातल्या लढ्याबरोबरच दैनंदिन जीवनातल्या विविध विषयांवर साधला संवाद

- भाजपा शासित राज्यांच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची परिषद आज नवी दिल्लीत

- फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेला आजपासून फ्रान्समध्ये प्रारंभ

**आणि**

- खेलो इंडिया बीच स्पोर्ट्स स्पर्धेत काल महाराष्ट्राला १२ पदकांची कमाई / पदकतालिकेत दुसरं स्थान

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूर ही केवळ एक लष्करी मोहिम नाही, तर ती आपला निर्धार, धैर्य आणि बदलत्या भारताचं प्रतिबिंब असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे.  या कारवाईने जगभरातल्या दहशतवादाविरुद्धच्या लढाईला नवीन विश्वास आणि उत्साह दिला असल्याचं  मोदी यांनी आकाशवाणीच्या मन की बात कार्यक्रमात सांगितलं. आज या कार्यक्रमाचा एकशे बावीसावा भाग प्रसारित झाला. ऑपरेशन सिंदूरमुळे देशभरात एकजूट आणि देशाभिमानाची भावना जागृत झाल्याचं सांगून ते म्हणाले की ठिकठिकाणी निघालेल्या तिरंगा यात्रांमधे त्याचं दर्शन घडतं. या मोहिमेनंतर संपूर्ण देशात वोकल फॉर लोकल या संकल्पनेलाही नवी ऊर्जा

मिळाली आहे, असं सांगून प्रत्येकानं स्वदेश निर्मित वस्तूंना प्राधान्य देण्याचा निर्धार करावा असं आवाहन त्यांनी केलं.

देशाच्या नक्षलग्रस्त भागात मूलभूत सोयी-सुविधा पोहोचू लागल्याचं सांगून गडचिरोली जिल्ह्यातल्या काटेझरी गावात पहिल्यांदाच बस सेवा पोहचल्याचं उदाहरण त्यांनी दिलं.

…. **होल्ड- बाईट - MKB 25.5.25 KATEZARI**

आंतरराष्ट्रीय योग दिनाला आता एका महिन्यापेक्षाही कमी काळ उरला असून, प्रत्येकाने आता योगाभ्यासाशी जोडून घ्यावं असं आवाहन त्यांनी श्रोत्यांना केलं. यंदाच्या योगदिनासाठी प्रधानमंत्री विशाखापट्टणममधल्या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

आयुर्वेदाच्या क्षेत्रातल्या प्रगती होत असल्याचं सांगत त्यांनी जागतिक आरोग्य संघटनेच्या महासंचालकांसोबत झालेल्या सामंजस्य कराराची माहिती दिली.

लहान मुलांना लहानपणापासूनच आरोग्यदायी जीवनशैलीच्या सवयी लावण्याचं आवाहन करुन प्रधानमंत्र्यांनी सीबीएसईच्या शाळांमध्ये मुलांना किती प्रमाणात साखर खावी याबद्दल जागरूक करण्यासाठी शुगर बोर्ड हा उपक्रम राबवला जात असल्याचं उदाहरण दिलं.

स्वच्छ भारत तसंच कचऱ्यापासून विशेषतः टाकाऊ कागदापासून पुनर्निर्मितीबाबत देशभर होत असलेल्या प्रयत्नांची उदाहरणंही त्यांनी श्रोत्यांसमोर मांडली. जालना इथं १०० टक्के पुनर्प्रक्रिया केलेल्या कच्च्या मालापासून पॅकेजिंग रोल आणि पेपर कोर बनवले जात असल्याचा उल्लेख त्यांनी केला. एक टन कागदाच्या पुनर्प्रक्रियेमुळे १७ झाडं वाचतात आणि हजारो लिटर पाण्याची बचत होते, अशी माहिती त्यांनी दिली.

नुकत्याच झालेल्या खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी रचलेल्या विक्रमांची माहिती मोदी यांनी दिली. अशा स्पर्धांमुळे क्रीडा क्षेत्रातलं भारताचं भविष्य उज्ज्वल होऊ शकेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

नुकत्याच साजरा झालेल्या जागतिक मधमाशी दिनाचा उल्लेखही त्यांनी केला. गोडव्यासोबतच आरोग्य, स्वयंरोजगार आणि आत्मनिर्भरतेतही मधाचं योगदान मिळू शकत असल्याची बाब त्यांनी अधोरेखित केली. गेल्या अकरा वर्षात भारतात मधमाशी पालन क्षेत्रात मधुर क्रांती घडून आली आहे असं ते म्हणाले. दहा अकरा वर्षांपूर्वी भारतातलं मध उत्पादनाचं प्रमाण वर्षाला ७० ते ७५ मेट्रिक टन इतकं होतं आता त्यात वाढ होऊन ते जवळपास सव्वा लाख मेट्रिक टनांपर्यंत पोहोचलं असल्याची माहिती त्यांनी दिली. मधाचं उत्पादन आणि निर्यातीत आता भारत जगातल्या आघाडीच्या देशांमध्ये पोहचला असल्याचं त्यांनी सांगितलं. राष्ट्रीय मधमाशी पालन आणि मध अभियानाची या यशात महत्वाची भूमिका असल्याचं ते म्हणाले. याअंतर्गतची यशस्वी व्यावसायिक उदाहरणं त्यांनी मांडली. मधमाशांच्या संरक्षण संवर्धनासाठी होत असलेल्या प्रयत्नांबद्दल सांगतांना त्यांनी पुणे इथल्या अमित याच्या प्रयत्नांचा उल्लेखही केला. याबद्दल अमित यानं आकाशवाणीकडे आपली भावना व्यक्त केली.

**होल्ड बाईट...**

गेल्या केवळ पाच वर्षांच्या काळातच गुजरातच्या गिर जंगलातली सिंहांची संख्या ६७४ वरून ८९१ झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. वन्यजीव संरक्षणासाठी आपल्याला कायमच जागरूक राहण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. देशभरातल्या ड्रोन दीदींची यशस्वी कामगिरीही त्यांनी आजच्या मन की बात मधून श्रोत्यांसमोर मांडली.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशात आणि राज्यात विविध ठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत.

यवतमाळ जिल्ह्यातही तिरंगा रॅली काढण्यात आली. याबाबत ऐकूयात सामान्य नागरिकांनी दिलेल्या प्रतिक्रिया....

**होल्ड.... बाईट**

**<><><><><>**

भाजपा शासित मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची परिषद आज नवी दिल्लीत होत असून या परिषदेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी संबोधित करत आहेत. भाजपाशासित सर्व २० राज्यांचे २० मुख्यमंत्री आणि १८ उपमुख्यमंत्री या परिषदेत सहभागी झाले आहेत. या परिषदेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तर उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे उपस्थित आहेत. सुशासन मुद्द्यांबाबत चर्चा करण्यासाठी या परिषदेचं आयोजन केलं आहे. यावेळी ऑपरेशन सिंदूरच्या यशासाठी भारतीय संरक्षण दल आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदींचे अभिनंदन करण्यात आले. तर केंद्र सरकारच्या जात गणना करण्याच्या निर्णयाबद्दल ही अभिनंदन करण्यात आलं. परिषदेपूर्वी उपस्थित मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी मन की बात हा कार्यक्रम ऐकला. या परिषदेला बिहारचे मुख्यमंत्री नितिश कुमार, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण, आणि दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्यासह इतर भाजपा शासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री उपस्थित आहेत.

**<><><><><>**

राज्य शासनाच्या १०० दिवस कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीमेच्या दुसऱ्या टप्प्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शासकीय विभागीय कार्यालयांची यादी जाहीर करण्यात आली असून त्यात कोकण विभागाला प्रथम क्रमांक मिळाला आहे. या मोहिमेत दुसरा क्रमांक नाशिक विभागाला तर तिसरा क्रमांक छत्रपती संभाजीनगर

विभागाला मिळाला आहे. राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी समाज माध्यमावर याची माहिती दिली आहे. या यशाबद्दल त्यांनी संबंधित विभागीय उपायुक्त कार्यालयातल्या सर्व कर्मचाऱ्यांचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

दीव दमण समुद्रकिनाऱ्यावर सुरू असलेल्या खेलो इंडिया बीच स्पोर्ट्स स्पर्धेत काल पाचव्या दिवशी महाराष्ट्राच्या संघाने पेंचक सिलट प्रकारात  ३ सुवर्ण, ४ रौप्य  आणि ५ कास्य अशी एकूण १२ पदकांची कमाई करत उपविजेतेपद पटकावलं.  बीच सॉकरमध्ये महाराष्ट्र पुरुष संघाने कास्यपदक मिळवलं. ५ सुवर्ण, ५  रौप्य, १० कास्य अशी २० पदकं जिंकून महाराष्ट्र पदक तालिकेत दुसऱ्या स्थानावर आहे.

**<><><><><>**

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेला आजपासून फ्रान्समध्ये सुरुवात होत आहे. या स्पर्धेत रोहन बोपण्णा, युकी भांब्री, एन. श्रीराम बालाजी आणि ऋत्विक चौधरी बोलिपल्ली हे खेळाडू भारताचं प्रतिनिधित्व करतील.

**<><><><><>**

क्वालालंपूर इथे आयोजित मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या किदाम्बी श्रीकांत याला अंतिम फेरीत चीनच्या शि फेंग ली याच्याकडून २१-११, २१-९ असा पराभव पत्करावा लागला. श्रीकांत याने जपानच्या तनाका या खेळाडूला पराभूत करून या स्पर्धेची अंतिम फेरी गाठली होती.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेटमध्ये आज दोन सामने होणार आहेत. गुजरात टायटन्सचा सामना चेन्नई सुपर किंग्जबरोबर अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीयमवर दुपारी

साडेतीन वाजता होणार आहे. चेन्नई सुपर किंग्ज नं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे. दुसरा सामना दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडीयमवर सनरायझर्स हैदराबाद आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात संध्याकाळी साडेसात वाजता होईल. कालच्या सामन्यात दिल्ली कॅप्टिल्सनं किंग्ज इलेव्हनचा ६ गडी राखून पराभव केला.

**<><><><><>**

राज्याच्या बहुतांश भागात पावसाचा जोर कायम असून रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा आणि कोल्हापूर या चार जिल्ह्यांना हवामान विभागानं रेड अलर्ट जारी केला आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यांसह पावसाचा अंदाज आहे, तर सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांत मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**